| | | |
|---|---|---|
| स्वच्छ भारत<br>एक पाऊल स्वच्छतेच्या दिशेने... | **जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष**<br>जिल्हा परिषद सोलापूर<br>ई मेल आयडी nbazpsolapur@gmail.com<br>कार्यालय फोन- .0217-2323080 | जिल्हा परिषद सोलापूर |

जा.क्रजि.प.सो./जि.पा.स्व.मि.क./ WQ 388 / २०२१ दि. १३ /०७/२०२१

**प्रति-**

सर्व (सोबत जोडले प्रमाणे)
स्वयंसेवी / व्यावसायिक संस्था

**विषय -** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्तरावर व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांचे एम्पनेलमेंट करणे कामी प्राप्त प्रस्ताव पडताळणी नुसार अपात्र संस्थांचे कागदपत्रांची पूर्तता व हरकती मागविणेबाबत..

**संदर्भ-** १.महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक/स्वभामि२०१९/ प्र.क्र. १४१/पापु-१६/ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दि.१९/०७/२०१९.

२.महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.स्वभामी-२०२०/प्र.क्र.११६/पापू-१६/ दि. २८ ऑक्टोबर २०२०

३.महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.स्वभामी-२०२०/प्र.क्र.११६/ पापू-१६/ दि. १२ जानेवारी २०२१

४.महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.स्वभामी-२०२०/प्र.क्र.११६/पापू-१६/ दि. १४ जानेवारी २०२१

५. जि.प.संकेतस्थळावरील जाहिरात व दैनिक.जनसत्य दि.२/६/२०२१,साप्ताहिक सोलापूर नमस्कार जाहिरात दि.३/६/२०२१ व जाहिरातीनुसार अंतिम दिनांक १६/०६/२०२१ पर्यंत प्राप्त संस्थांचे प्रस्ताव.

६. मा.मुकाअ जि.प.सोलापूर यांचेकडील पत्र क्र. जा.क्र./जिपसो/जिपास्वामिक/WQ३४५/२०२१ दि.२५/०६/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंमलबजावणी करीता ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली आहे.संदर्भ क्र.१,२,३,४ च्या मंजूर टिप्पणीनुसार प्रकल्पांचे परीक्षण,विकास व अंमलबजावणी करणेसाठी,जिल्हास्तरावर व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्थाची एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) पद्धतीने एम्पनेलमेंट करून त्यांचेकडून सर्वेक्षण करणे,अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे,आराखडे तयार करणे,पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे याबाबी करीता जाहिरात देण्यात आली होती.त्यानुसार संदर्भ क्र-५ नुसार ९० संस्थांचे पोस्टाने,कुरिअर,समक्ष हार्डकॉपी व इमेल द्वारे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

तसेच संदर्भ क्र.६ नुसार सदर संस्था निवड प्रक्रियेसाठी जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या अधिपत्याखाली नेमलेल्या जिल्हास्तरीय पडताळणी उप समिती यांनी प्राप्त झालेल्या व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्थाची कागदपत्रांची छाननी व तपासणी केली असता सदर प्राप्त एकूण ९० संस्थांपैकी फक्त ३ संस्था कागदोपत्री तपासणीअंती पात्र झाले असून उर्वरित ८७ संस्था अपात्र झाले आहेत.तेव्हा सोबत जोडलेल्या यादीतील अपात्र झालेल्या ८७ संस्थांना कागदपत्रांची पूर्तता व हरकती सादर करणेकरीता समक्ष दिनांक - २२ /०७/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्वीकारण्यात येईल. तदनंतर आलेल्या हरकतींचा व पूर्ततेचा कोणताही विचार केला जाणार नाही याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**सोबत-**

१) ८७ स्वयंसेवी/व्यावसायिक संस्थेची अपात्र यादी.

२) ३ स्वयंसेवी/व्यावसायिक संस्थेची पात्र यादी.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
**(पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा परिषद सोलापूर**

**प्रत-** १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापूर यांना माहितीस्तव सविनय सादर.